# ‘मेट्रो ३’ मार्गिका टप्प्यातील मार्गरोधक सप्टेंबरपर्यंत हटवणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) ‘कुलाबा - वांद्रे - सीप्झ मेट्रो ३’ मार्गिकेच्या कामासाठी ३३.५ किमी लांबीच्या मार्गात उभारलेले रस्ता रोधक (बॅरिकेट्स) दोन टप्प्यात हटविण्याचा निर्णय घेतला आहे. जूनपर्यंत ४४ रस्ते, तर सप्टेंबरपर्यंत ४९ रस्ते रोधकमुक्त करण्यात येणार आहेत.

‘मेट्रो ३’चे काम २०१६ च्या अखेरीस सुरू करण्यात आले. या कामासाठी ३३.५ किमी लांबीच्या मार्गात रस्तारोधक उभारण्यात आले असून अनेक रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. जानेवारी २०१७ पर्यंत आवश्यक ते सर्व रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले. तर काही रस्त्यांवरून एक दिशा वाहतूक सुरू ठेवण्यात आली. परिणामी, वाहतूक कोंडीचा प्रश्न जटिल बनला असून मागील सहा-सात वर्षांपासून मुंबईकरांना त्याची झळ बसत आहे. मात्र आता कुलाबा - सीप्झ दरम्यानच्या सर्व रस्त्यांवरील रस्तारोधक हटविण्यात येतील.

## टप्पेनिहाय काम

जसजसे काम पूर्ण होईल तसतसे जूनपर्यंत ४४ मार्गरोधक मुक्त करण्यात येणार आहेत. यात कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, महालक्ष्मी, सिद्धिविनायक, धारावी, बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रूझ, सहार, टर्मिनल १, मरोळ नका, एमआयडीसी, आणि सीप्झ येथील रस्त्यांचा समावेश आहे. तर सप्टेंबरपर्यंत ४९ रस्ते मोकळे होणार आहेत. यात कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, काळबादेवी, गिरगाव, ग्रॅन्ट रोड, मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक, वरळी, दादर, शीतलादेवी येथील रस्त्यांचा समावेश आहे.